# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २८१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०६/२०१८

**१) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन हातोडीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ३१/०५/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती माया विश्वनाथ मंडपे वय ५५ वर्ष, रा. धानोरी हिचा मुलगा आरोपी हा फिर्यादी पासुन वेगळा राहत असता फिर्यादीला तु माझे घरची पुर्तता का करित नाही म्हणुन भांडण करायचा फिर्यादीचे २ मुले वर्धा येथुन कमाई करुन गावी परत आल्यावर जेवन करित असतांनी फिर्यादीने आपल्या मुला जवळ आरोपी हा मला राशन कार्ड वरील नाव वेगळा करुन दे! म्हणुन भांडण करुन शिवीगाळ करतो असे सांगत असतांनी यातील आरोपी याने माझ्या गोष्टी करित आहेत असे म्हणुन घरातुन लोखंडी हातोडी आणुन मुलगा मंगेश मंडपे याचे डोक्यावर होतोडी मारुन जखमी केले व शिवीगाळ करीत असता फिर्यादीचा मजवा मुलगा सुरेन्द्र हा मधात आडवा आला असता त्याचे डोक्यावर हातोडीने मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,३२३,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रहांगडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) संगनमत करुन बिनापासपरवाना रेती चोरुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ०१/०६/२०१८ चे २१.०० चे दरम्यान यातील आरोपीतांनी आपआपले टिप्पर व टॅक्ट्र चालकांनी त्याचे मालकाशी संगनमत करुन बंद असलेल्या जुनोना रेती घाटा वरील बिनापरवाना आपले वाहना मध्ये ४ ब्रास रेती किंमती ८,०००/-रु ची चोरीने वाहतुक करतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. ढाकणे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ०१/०६/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीस सार्वजनिक ठिकाणी आमच्या मनाप्रमाणे लग्न केले नाही असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करीत असता फिर्यादीचे पतीने आरोपीस तु शिवीगाळ कशाला करतोस असे म्हणुन हटकले असता आरोपीने फिर्यादीचे पतीस ढकलढुकल करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन ब्लेडने उजवेहाताचे भुजेवर मारुन जखमी करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,२९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खैरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन थापडबुक्यांनी छातीवर व नाकावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ०१/०६/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस तुला पैसे मागण्याकरीता आजचाच दिवस भेटला का असे म्हणुन शिवीगाळ करुन थापडबुक्यांनी छातीवर व नाकावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी श्रीकांत बाबुराव हलमारे वय अंदाजे ३५ वर्ष, रा. बासोरा यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुसावळे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) अपघात होवुन स्वत:ला मार लागल्याने इसमाचा मृत्यु :—**

दिनांक ०१/०६/२०१८ चे १५.४५ वाजता दरम्यान यातील मृतक अरुण हरीराम खैरागडे वय ४५ वर्ष, रा. बपेरा याने फिर्यादीचे वडील हे खाजगी गाडीवर वाहक असुन दिनांक १३/०४/२०१८ रोजी बालाघाट येथुन मोहाड येथे जिन यांचे खाजगी गाडीने प्रवासी घेवुन येत असतांनी झालेवाडा येथे अपघात होवुन स्वत:ला मार लागल्याने नागपुर मेडीकल कॉलेज येथे उपचार घेवुन त्यास घरी परत आणुन प्रकृती गंभिर असल्याने दिनांक ०१/०६/२०१८ ला घरीच मरण पावल्याने फिर्यादी उमेश अरुण खैरागडे वय २७ वर्ष, रा. बपेरा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. सेलोकर पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**६) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०१/०६/२०१८ चे २०.३० ते २१.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन रोड दुरुस्तीचे ठिकाणी रोडचे मध्यभागी वाहतुकीस धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनि.पुसाटे पो.स्टे. दिघोरी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. पुसाटे पोलीस स्टेशन दिघोरी करीत आहेत.

**७) अवैध हातभट्टी,देशी दारु / जुगार अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक ०१/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, तुमसर व लाखनी येथे हातभट्टी, देशी दारू/ जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभट्टी किंमती ५००/—रु. व ०१ लिटर ४४० मिली लिटर देशी / विदेशी दारु किंमती ४१६/—रु. तसेच जुगारातुन १४६०/—रु. असा एकुण किंमती २,३७६/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०१/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी — ०२, तीन सिटर वाहनाकरीता— ०८ ईतर वाहनांवरती — ८७ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.